# गाय/म्हशीसाठी जंत (कृमी) नाशक औषधी पाजण्याचे (डिवर्मींग) लसीकरणाचे इ. वेळावत्रक

डॉ. बी. एस. खिल्लारे आणि डॉ. बि. डब्ल्यू. नरळदकर, पशुवैद्यक महाविद्यालय, परभणी

| | |
|---|---|
| **गोलकृमीसाठी**  | १) पहिली मात्रा - वयाच्या ७ ते १० व्या दिवशी.<br>२) तद्नंतर प्रत्येक महिन्यास ६ महिन्यापर्यंत.<br>३) पावसाळयामध्ये ३५-४० दिवसांच्या अंतराने (२वर्षापर्यंत) ३ वेळेस.<br>टीप: साधारणपणे गाय/म्हशीमध्ये तीन वर्षांनंतर गोलकृमीची लागण होत नाही म्हणून वयस्क जनावरात नियमितपणे जंतनाशक औषधीची आवश्यकता भासत नाही. तरी परंतु पावसाळा जास्त झाल्यास व कृमींची संख्या वाढल्यास पशुवैद्यक तज्ञांचा सल्ला घेउनच देणे. |
| **लिव्हरफलुक (पर्णकृमीसाठी)**  | • रोगाची लागण झालेल्या क्षेत्रामध्ये विशेषत: नदी/नाल्याकाठी गोगलगायीचे प्रमाण पावसाळयामुळे वाढल्यानंतर पावसाळयामध्ये एक वेळ व नंतर तीन महिन्याच्या अंतराने दुसरी मात्रा. |
| **पट्टकृमीसाठी**  | • पावसाळयामध्ये गवताची पूर्ण वाढ झाल्यानंतर व वासरे गवतावर चरावयास सुरूवात केल्यानंतरच प्रथम मात्रा व नंतर तीन महिन्यांच्या अंतराने एक वेळेस. |
| **थायलेरीयासीस** | • लसीकरण - रक्षा व्हॅकटी नावाची लस वयाच्या दोन महिन्यानंतर व नंतर प्रत्येक तीन वर्षाने |
| **सरा (ट्रिपॅनोझोनियासीस)** | औषधाद्वारे प्रतिबंध : औषधाद्वारे पावसाळयाच्या सुरूवातीस क्वनापायरॅकीन नावाच्या औषधीची मात्रा. |
| **रक्त हगवण : कॉक्सीडीओससाठी** | वासराने माती चाटावयास सुरूवात केल्यानंतर ॲम्प्रोलीयम औषधीची मात्रा दर पंधरा दिवसांनी तीन महिन्यापर्यंत. |

# शेळी/मेंढीसाठी जंत (कृमी) नाशक औषधी पाजण्याचे (डिवर्मींग) वेळापत्रक

डॉ. बि. डब्ल्यू. नरळदकर आणि डॉ. बी. एस. खिल्लारे, पशुवैद्यक महाविद्यालय, परभणी

| | |
|---|---|
| **गोलकृमीसाठी**  | १) प्रथम मात्रा १-२ महिन्याच्या अंतराने ६ महिन्यापर्यंत<br>२) २ महिल्सरव्सर अंतीरले १२ महिन्यापर्यंत (पावसाळा सुरूवात, पावसाळा मध्य, पावसाळा संपल्यानंतर)<br>३) नंतर प्रतिवर्षी पावसाळयामध्ये ३५ ते ४० दिवसांच्या अंतराने चार वेळेस<br>४) हिवाळयामध्ये हिवाळा संपताना.<br>मेंढीस कृमीचे संग्रहालय असे म्हणतात म्हणून प्रोढ शेळी/ मेंढीमध्ये देखील कृमीनाशक औषधीची मात्रा देणे आवश्यक ठरते. |
| **लिव्हरफ्लुक (पर्णकृमीसाठी)**  | रोगाची लागण झालेल्या क्षेत्रामध्ये पावसाळयाच्या सुरूवातीस व पावसाळा संपल्यानंतर एकूण दोन वेळेस.<br> <br>(पोटातील पर्णकृमी) (गोगलगायीचे नियंत्रण आवश्यक) |
| **पट्टकृमीसाठी**  | वर्षातून दोन वेळेस जून व ऑक्टोबर. |
| **रक्त हगवण : कॉक्सीडीओससाठी** | शेळया/मेंढयांच्या कोकरांनी माती चाटावयास सुरूवात केल्याबरोबर औशधीची मात्रा द्यावी. (साधारणपणे वयाच्या १५ व्या दिवसानंतर) |

- पशुवैद्यक तज्ञाच्या सल्ल्याने दर डिवर्मींगच्या वेळेस औषध बदलावे.
- औषधीची मात्रा कमी किंवा जास्त देउ नये.
- जंतनाशक मात्रा व वेळापत्रक तंतोतंत पाळावे.
- पावसाळयाचे कालचक्र दरवर्षी बदलत असल्यामुळे जंतनाशकाचा वापर पावसाच्या आगमनानंतर व जंताच्या प्रादुर्भावानुसार करावा.